१०८

शहर अभियंता कार्यालय
बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका
ईमेल–
210roadwidening@punecorporation.org

जा.क्र. डिपीसेल/४७३
दि. २८/१२/2020

# जाहीर प्रकटन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१)(ब) अन्वये पुणे शहरातील ९ मी. रुंदीच्या आतील पुढीलप्रमाणे निर्देशित ३३५ रस्त्यांचे रस्ताप्रमाणरेषेत बदल करुन सदरचे रस्ते हे ९ मी. रुंद करणेची कार्यवाही प्रथम टप्प्यामध्ये करावयाची आहे. त्यासाठी नागरीकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत.

अस्तित्वातील रस्ता व त्यामध्ये बदल दर्शविणारा रस्ता यांचे नकाशे शहर अभियंता कार्यालय, बांधकाम विकास विभाग, पहिला मजला पुणे महानगरपालिका कार्यालयात नागरीकांना पाहण्यासाठी ठेवण्यात आलेले आहेत. सदर नकाशे कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायं ६.०० वाजेपर्यंत पाहण्यासाठी उपलब्ध राहतील. तसेच सदर नकाशे पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध राहतील.

तरी रस्ताप्रमाणरेषेत बदल करणेस ज्या नागरीकांना हरकती व सूचना द्यावयाच्या असतील त्यांनी शहर अभियंता, पुणे महानगरपालिका यांचेकडे लेखी स्वरुपात अथवा ई–मेलद्वारे (210roadwidening@punecorporation.org ) शहर अभियंता कार्यालय, बांधकाम विकास विभाग, पहिला मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे–५ या कार्यालयात त्यांच्या हरकती व सूचना लेखी पाठवाव्यात. हरकती व सूचना पाठविणेची मुदत या जाहीर प्रकटनाचे प्रसिध्दी दिनांकापासून एक महिना राहील.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका